# जिल्हा परिषद लातूर विशेष अर्थसंकल्पीय सभा दिनांक 12/03/2026

विषय- जिल्हा परिषद लातूरचे स्वसंपादीत उत्पन्न व खर्चाचे सन 2025-26 चे सुधारित व 2026-27 चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत.

संदर्भ -1 महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति अधिनियम 1961 चे कलम 137

2.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति अर्थसंकल्पीय अंदाज पत्रक 1966 चे नियम 8 व 9

3. मा मुकाअ यांचेकडे झालेली खाते/विभाग प्रमुखांची अढावा बैठक दिनांक 05/03/2026

4. अर्थसंकल्पीय, अर्थ समिती सभा दिनांक /03/2026

5.महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग असाधारण क्रमांक 26 दिनांक 11 मार्च 2022 व याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेले आदेश

6.मा मुकाअ तथा प्रशासक यांचेकडे जि.प.अंदाजपत्रक अंतीम करणे बाबत झालेली जि.प.सर्वसाधारण सभा दिनांक 12/03/2026

आज दिनांक 06/03/2026 रोजी ,जिल्हा परिषद लातूरचे स्वसंपादीत उत्पन्न व खर्चाचे सन 2025-26 चे सुधारित व 2026-27 चे मुळ अंदाजपत्रकाबाबत सर्व विभाग/खाते प्रमुखांच्या उपस्थितीत जि.प.सर्वसाधारण सभा घेउन विभागाने मागणी केलेनुसार व संदर्भ क्रं 3,4 व 6 नुसार एकूण रू 556283133/-**(अक्षरी रू पंचावन्न कोटी बासष्ठ लक्ष त्रेऐंशी हजार एकशे तेहतीस रू फक्त)** जमेचा व 377861000/-**(अक्षरी सदोतीस कोटी अष्ठयाहात्तर लक्ष एकसष्ठ हजार रू फक्त)** खर्चाचे अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे.व सदर अर्थसंकल्पास संदर्भ क्रं 1 व 2 नुसार 27 मार्च 2026 पुर्वी मान्यता घेणे आवश्यक आहे. **संदर्भीय 4 च्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग असाधारण क्रमांक 26 दिनांक 11 मार्च 2022 व याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेले आदेशा नुसार 20 मार्च 2022 नंतर महाराष्ट्र जि.प. व प.स.अधिनियम 1961 (सन 1962 चा 5 ) मधील कलम 91 ब व 75 ब या कलमांन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासने जिल्हा परिषंदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदांच्या सर्व अधिकरांचा वापर करण्यासाठी व त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले आहे.**

जिल्हा परिषद लातूरचे स्वसंपादीत उत्पन्न व खर्चाचे सन 2025-26 चे सुधारित व 2026-27 चे मुळ अंदाजपत्रकाबाबत जि.प.सर्वसाधारण सभा घेउन तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 137 (4) नुसार व जिल्हा परिषद व पंचायत समिती अर्थसंकल्प अंदाज 1966 चे नियम 9 नूसार जिल्हा परिषदेचे स्वसंपादीत उत्पन्न व खर्चाचे ,पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्तीचे ,घसारा निधीचे ,पंचायत समिती उपकराचे अंदाजपत्रक दरवर्षी 27 मार्च पूर्वी सभागृहासमोर सादर करून मंजूर करणे आपणास बंधनकारक आहे.दरवर्षी आपण विहीत मूदतीत ही कार्यवाही पार पाडलेली आहे. घटनात्मक दृष्टीने बंधनकारक अशा **समाजकल्याण,महिला बालकल्याण,अपंग कल्याण,पाणीपुरवठा, ई-गव्हर्नस,वृक्ष संगोपन** व तसेच **दिनांक 11/02/2020**

च्या **शासन निर्णयानुसार शिक्षण विभागासाठी 5 %** यांच्या सर्व तरतूदी नियमानूसार केलेल्या आहेत.

तसेच उत्पन्नाच्या 61% तरतूदी ह्या घटनात्मक दृष्टीने कायम ठेवणयात आलेल्या आहेत.त्यामुळे खालील उत्पन्नाच्या **20% रक्कम समाजकल्याण विभागास** ठेवण्यात आलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | कर व फी | 1000 | एक हजार |
| 2 | मूळ उपकर | 5400000 | चोपन्न लक्ष |
| 3 | वाढीव उपकर | 7800000 | अष्ठ्याहात्तर लक्ष |
| 4 | उपकर सापेक्ष अनूदान | 100000 | एक लक्ष |
| 5 | 50% मूद्रांक शुल्क अनूदान | 60000000 | सहा कोटी |
| | **एकूण** | **73301000** | **सात कोटी तेहतीस लक्ष एक हजार** |

एकूण उत्पन्न रू 73301000/- (अक्षरी रू सात कोटी तेहतीस लक्ष एक हजार फक्त) च्या 20 % प्रमाणे 14660200/- (अक्षरी रू एक कोटी शेहचाळीस लक्ष साठ हजार दोनशे फक्त) ची तरतूद ठेवणे अपेक्षीत असतानाही(अनुशेषासह) तरतूद रू 21909000/-(अक्षरी रू दोन कोटी एकोणीस लक्ष नउ हजार फक्त) विभागाच्या मागणीनुसार **समाजकल्याण विभागाला** उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.तसेच उपरोक्त उत्पन्नाच्या 10% प्रमाणे रू 7330100/-(अक्षरी रू त्रेहात्तर लक्ष तीस हजार एकशे फक्त) तरतूद ठेवणे अपेक्षीत असतानाही विभागाच्या मागणीनुसार रू 16620000/-(अक्षरी रू एक कोटी सहासष्ठ लक्ष वीस हजार फक्त) तरतूद **महीला व बालकल्याण विभागाला** उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.तसेच **अपंग (दिव्यांग)कल्याणासाठी 5%** प्रमाणे( महसूली जमेच्या) रू 7983350/-(अक्षरी रू एकोणऐंशी लक्ष त्रेऐंशी हजार तिनशे पन्नास फक्त) ची तरतूद ठेवणे अपेक्षीत असतानाही विभागाच्या मागणीनुसार रू 24200000/-(अक्षरी रू दोन कोटी बेचाळीस लक्ष फक्त) (अनुशेषासह) विभागाच्या मागणीनुसार तरतूद करण्यात आलेली आहे.तसेच **ई-गव्हर्नस साठी** 0.5% प्रमाणे 7500000/-(अक्षरी रू पंच्याहात्तर लक्ष फक्त) ची तरतूद केलेली आहे. वृक्ष संगोपनासाठी 0.5% प्रमाणे 1501000/-(अक्षरी रू पंधरा लक्ष एक हजार फक्त) ची तरतूद केलेली आहे. तसेच शासन निर्णय ग्रामविकास विभाग दिनांक 11/02/2020 नुसार 5% **शिक्षण विभागासाठी** एकूण 47101000/-(अक्षरी रू चार कोटी एकाहात्तर एक हजार लक्ष फक्त) तरतूद करण्यात आलेली आहे.

खालील प्रमाणे उत्पन्नाच्या 20% रक्कम पाणी पुरवठा निधीसाठी ठेवण्यात आलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | ठेकेदारास दंड | 2000000 | विस लक्ष |
| 2 | मूळ उपकर | 5400000 | चोपन्न लक्ष |
| 3 | ईमारत व संयत्र भाडे | 1000000 | दहा लक्ष |
| 4 | रोख ठेवी वरील व्याज | 70000000 | सात कोटी |
| | **एकुण** | **78400000** | **सात कोटी चौ-याऐंशी लक्ष** |

**पाणी पुरवठा निधीसाठी** एकुण उत्पन्न 78400000 /- (अक्षरी सात कोटी चौ-याऐंशी लक्ष फक्त) च्या 20% प्रमाणे रु. 15680000/- (अक्षरी एक कोटी छपन्न लक्ष ऐंशी हजार

फक्त) ची तरतुद देय असतानाही रू 32001000/- (अक्षरी तिन कोटी विस लक्ष एक हजार फक्त) अशी भरीव तरतुद करण्यात आलेली आहे.

वरिल प्रमाणे 61% निधी म्हणजेच **रू 150832000**/-(अक्षरी रू पंधरा कोटी आठ लक्ष बत्तीस हजार फक्त) चा निधी नियमानुसार त्या बाबीवर ठेवणे घटनात्मकदृष्टया बंधनकारक होते.उर्वरित निधीतून आपला अ-प्रशासनावरील अनिवार्य खर्च रू **29206000**/-(अक्षरी रू दोन कोटी ब्याण्णव लक्ष सहा हजार फक्त) हा पदाधिका-यांचे मानधन,सादिल,प्रवास भत्ते,बैठक खर्च,इंधन,फोन, फर्निचर इ.बाबीवर ठेवणे अनिवार्य आहे. उर्वरीत उपलब्ध निधीमधून विभाग निहाय तरतूद पूढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

| अंक्र | विभागाचे नाव | केलेली तरतूद | अक्षरी रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | सामान्य प्रशासन विभाग(0.50% ई गव्हर्नस सह) | 19200000 | एक कोटी ब्याण्णव लक्ष |
| 3 | बांधकाम विभाग | 47106000 | चार कोटी एकाहात्तर लक्ष सहा हजार |
| 4 | लघुपाटबंधारे विभाग | 2001000 | विस लक्ष एक हजार |
| 5 | वैद्यकीय सेवा | 23702000 | दोन कोटी सदोतीस लक्ष दोन हजार |
| 6 | कृषी विभाग | 11309000 | एक कोटी तेरा लक्ष नउ हजार |
| 7 | पशुसंवर्धन विभाग | 30703000 | तीन कोटी सात लक्ष तिन हजार |
| 8 | संकीर्ण | 44776000 | चार कोटी सत्तेचाळीस लक्ष शहात्तर हजार |
| 9 | भांडवली खर्च | 26526000 | दोन कोटी पसष्ठ लक्ष सव्वीस हजार |
| | | **205323000** | |

तसेच दिनांक 01 जानेवारी 2026 रोजी समायोजित न झालेली आग्रीमे यांना मान्यता देण्यात आली तसेच शासनाकडून हस्तांतरीत,अभिकरण योजना व रोख अनुदानाच्या रकमा जशा प्राप्त होतील तशा मान्यता देण्यात येत आहेत. तसेच सर्व योजनांच्या कमी/जास्त खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

जिल्हा परिषद लातूरचे स्वसंपादीत उत्पन्न व खर्चाचे,पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्तीचे ,घसारा निधीचे ,पंचायत समिती उपकराचे सन 2025-26 चे सुधारित व 2026-27 चे मुळ अंदाजपत्रकास सभाग्रहामध्ये सर्वसमावेशक चर्चा होउन संदर्भीय 1 ते 6 प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

## जिल्हा परिषद स्वसंपादीत उत्पन्न व खर्चाचे सन 2026-27 चे अंदाजपत्रकातील ठळक वैशिष्ट्ये

- **<u>संविधानिक दृष्ट्या व नियमानुसार आरक्षित निधी</u>**
- **14.समाजकल्याण विभाग- (20 टक्के प्रमाणे ) एकूण तरतुद रू 219.09 लक्ष.**
- ग्रामीण भागातील विशेषत: मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अंदाजपत्रकात ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय दिनांक 20 ऑक्टोबर 1999 नुसार अनुशेषासह तरतूद ठेवण्यात आलेली आहे .तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी संगणक व प्रशिक्षण (MS-CIT व Tally) साठी तरतुद ठेवण्यात आलेली आहे.
- **दिव्यांग कल्याण -(5 टक्के प्रमाणे ) एकूण तरतुद रू 242.00 लक्ष.**
- ग्रामीण भागातील विशेषत: दिव्यांगाच्या कल्याणासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अंदाजपत्रकात शासन निर्णय 25 जुन 2018 नुसार अनुशेषासह तरतूद ठेवण्यात आलेली आहे .
- **18.महिला व बालकल्याण -(10 टक्के प्रमाणे ) एकूण तरतुद रू 166.20 लक्ष.**
- ग्रामीण भागातील विशेषत: महिला व बालकल्याणासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अंदाजपत्रकात शासन निर्णय दिनांक 14 जानेवारी 2014 व 19 जानेवारी 2021 नुसार तरतूद करण्यात आलेली आहे.तसेच महिलांना विविध साहित्य योजनेअंतर्गत एकल महिला-विधवा,परितक्त्या व घटस्फोटीत महिलांसाठी विशेष तरतुद करण्यात आलेली आहे.
- **3.शिक्षण विभाग -(5 टक्के प्रमाणे ) एकूण तरतुद रू 471.01 लक्ष.**
- शासन निर्णय दिनांक 11/02/2020 नुसार अंदाजपत्रकात ज्या प्राथमिक शाळांच्या देखभाल दुरूस्तीसाठी इतर शासकीय योजनांमधून निधी मिळण्यास आडचणी निर्माण होत आहेत अशा शाळांसाठी विशेष तरतूद करण्यात आलेली आहे.
- **9.सार्वजनिक आरोग्य अभियांत्रीकी/पाणी पुरवठा--(20 टक्के प्रमाणे ) एकूण तरतुद रू 320.01 लक्ष.**
  शासन निर्णय दिनांक 17 नोव्हेबंर 1986 व व 17 ऑक्टोबर 2014 नुसार अंदाजपत्रकात तरतूद ठेवण्यात आलेली आहे.
- **13.वन विभाग- (0.50 टक्के प्रमाणे ) एकूण तरतुद रू 15.01 लक्ष.**
- शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक 25 जुलै 2018 नुसार वृक्ष संगोपनासाठी तरतूद ठेवण्यात आलेली आहे.
- **1.अ-प्रशासन व सामान्य प्रशासन विभाग -(0.50 टक्के प्रमाणे ई-गव्हर्नन्ससह ) एकूण तरतुद रू 484.06 लक्ष.**
- शासन निर्णय साप्रवि दिनांक 18 जुन 2010 नुसार ई-गव्हर्नन्ससाठी तरतूद ठेवण्यात आलेली आहे.
- जि.प.नव्याने निवडून आलेल्या पदाधिका-यासाठी मानधन,प्रवास भत्ता,बैठक खर्च,वाहन फोन फर्निचर व इतर भत्यासाठी आवश्यक तरतूद करण्यात आलेली आहे.
- समान्य प्रशासन विभागाअंतर्गत प्रशासकीय बाबीसाठी आवश्यक व जिल्हा परिषदेचे प्रशासन गतिमान, पारदर्शक, डिजीटलाईज व अधिक लोकाभीमुख बनविण्यासाठी आवश्यक तरतुद करण्यात आलेली आहे.

## इतर विभागासाठीच्या विविध विकास योजनांसाठी पुढील प्रमाणे तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

- **क-सार्वजनिक बांधकामे-4 इमारत व दळणवळण - एकूण तरतुद रू 471.06 लक्ष.**
- जिल्हा परिषदेअंतर्गत इमारतीची देखभाल दुरुस्ती,कर व भाडे,स्वच्छता व देखभाल सुरक्षा रक्षक इत्यादीसाठी आवश्यक तरतुद करण्यात आलेली आहे.
- **5 लघु पाटबंधारे विभाग-(सिंचन)- एकूण तरतुद रू 20.01 लक्ष.**

9 तलाव / कोल्हापूरी बंधा-यासाठी विशेष अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

- **8 स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य-8-वैद्यकीय- एकूण तरतुद रू 237.02 लक्ष.**
  तसेच सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करणे तसेच गूणवत्ता पुर्ण वैद्यकीय सेवा पुरविणे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी यंत्रसामग्री/उपकरणे व सहित्याचा पुरवठा करणे (Biowestage).
- **11.कृषी विभाग- एकूण तरतुद रू 113.09 लक्ष.**
- **आदर्श शेतकरी पुरस्करासाठी** व अधुनिक तंत्रज्ञानावर अधारीत कृषी औजारे, संयत्रे, अपंगासाठी व इतर शेतक-यासाठी कडबाकूट्टी तसेच सोयाबीन ग्रेडींग यंत्र,बिज प्रक्रिया प्रात्यक्षीक,रूंद सरी वरंबा इत्यादी यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.
- **12.पशुसंवर्धन विभाग- एकूण तरतुद रू 307.03 लक्ष.**
- देवणी गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी तसेच औषध व लस पुरठा,पशुवैद्यकीय सोयी सुविध,पशुप्रदर्शन व मेळावे,गोदाम/पशुवैद्यकीय दवाखाने बांधकाम इत्यादी साठी आवश्यक तरतूद करण्यात आलेली आहे.
- **ग्रामीण भागातील शेती व्यवसायाला पुरक व्यवसाय म्हणून पशुपालन केले जाते.**
- **20.संकीर्ण- एकूण तरतुद रू 447.76 लक्ष.**
- स्थानिक विकास कामाचा कार्यक्रम,जिल्हा परिषदेअंतर्गत पदाधिकारी , अधिकारी व कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण,क्रिडा व सांस्कृती स्पर्धा,अदर्श कर्मचारी पुरस्कार यांच्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद ठेवण्यात आलेली आहे.
- **भांडवली खर्च- एकूण तरतुद रू 265.26 लक्ष.**
- ठेवी व आग्रीम,मागणी न केलेल्या ठेवी इत्यादी साठी तरतूद करण्यात आलेली आहे.